मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १३७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जालना महानगरपालिका निवडणूक: प्रभाग ९

## ‘विष्णूअस्त्र’ चालणार की ‘महावीर’ बाजी मारणार?

### प्रतिष्ठेच्या लढतीकडे संपूर्ण शहराचे लक्ष

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या पहिल्या ऐतिहासिक निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून, संपूर्ण शहराचे राजकीय वातावरण तापले आहे. एकूण १६ प्रभागांमध्ये होत असलेल्या या निवडणुकीत सर्वाधिक चुरस आणि प्रतिष्ठेची लढत प्रभाग ९ (क गट) मध्ये पाहायला मिळत आहे. येथे शिवसेनेचे (शिंदे गट) विष्णू पाचफुले आणि भारतीय जनता पक्षाचे महावीर ढक्का यांच्यात थेट 'कांटे की टक्कर' होत असून, उद्या १३ जानेवारी रोजी प्रचाराची तोफ थंडावणार आहे.

**आमदार खोतकरांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न**

या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार विष्णू पाचफुले हे केवळ नगरसेवक पदाचे उमेदवार नसून, ते महापौर पदाचे प्रमुख दावेदार मानले जात आहेत. माजी मंत्री तथा आमदार अर्जूनराव खोतकर यांनी वेळोवेळी पाचफुले यांच्या नावाचा महापौर म्हणून उल्लेख केल्याने, ही जागा निवडून आणणे खोतकर यांच्यासाठी प्रतिष्ठेचे बनले आहे. पाचफुले यांनी गेल्या काही दिवसांत 'डोअर टू डोअर' प्रचार आणि कॉर्नर बैठकांच्या माध्यमातून प्रभागावर आपली पकड मजबूत केल्याचे चित्र आहे.

**महावीर ढक्कांसमोर गड राखण्याचे आव्हान**

दुसरीकडे, भाजपचे महावीर ढक्का हे या प्रभागाचे 'रनिंग' नगरसेवक असल्याने त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ढक्का यांची ओळख आहे. गोरंट्याल यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन भाजपमध्ये प्रवेश केला, तेव्हा ढक्का यांनीही त्यांच्यासोबत भाजपचा झेंडा हाती घेतला. भाजप-शिवसेना युती फिस्कटल्याने आता हे दोन दिग्गज नेते आणि त्यांचे उमेदवार आमनेसामने ठाकले आहेत. ढक्का यांच्यासाठी आपला जुना गड राखणे हे मोठे आव्हान असणार आहे. त्यातल्या त्यात याचा प्रभागातील ब गटातील उमेदवार सौ. संध्या संजय देठे ह्या पॅनल टू पॅनल मतदान करवून घेतात की एकला चलो रे चा नारा देतात यावर ही महावीर ढक्का यांचे नशिब अवलंबून आहे. यापुर्वी या भाजपाच्या या दोन्ही उमेदवारांमध्यील वाद चव्हाट्यावर आला होता. तो वाद माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या मध्यस्थीने मिटविला गेला असला तरी ऐन निवडणुकीत मतदानाच्या दिवशी उमेदवार काय निर्णय घेतात काय करवुन घेतात यावर बरेच काही अवलंबून आहे.

**'विष्णूअस्त्र' की 'धक्का'? चर्चेला उधाण**

प्रभाग ९ मध्ये सध्या विष्णूअस्त्र प्रभावी ठरणार की ढक्का यांना राजकीय धक्का बसणार, याची चर्चा गल्लीबोळांत रंगली आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, जर विष्णू पाचफुले यांची लाट प्रभावी ठरली, तर त्याचा फायदा प्रभाग ९ मधील शिवसेनेच्या इतर तिन्ही उमेदवारांना (पॅनलला) मिळण्याची शक्यता आहे. पाचफुले यांच्या विजयाने शिवसेनेचा महापौर पदाचा मार्ग सुकर होऊ शकतो, तर ढक्का यांच्या विजयाने भाजपचे वर्चस्व सिद्ध होईल.

१३ जानेवारी: प्रचाराचा शेवटचा दिवस (तोफ थंडावणार). १५ जानेवारी: मतदान प्रक्रिया पार पडणार. १६ जानेवारी: मतमोजणी आणि निकाल.

**मतदार राजा कुणाला देणार कौल?**

दोन्ही उमेदवारांनी रॅली, सभा आणि वैयक्तिक गाठीभेटींतून मतदारांना आकर्षित करण्याचा कोणताही प्रयत्न सोडलेला नाही. मात्र, १५ तारखेला मतदार राजा कुणाच्या बाजूने कौल देतो आणि १६ तारखेला विजयाचा गुलाल कोण उधळतो, याकडे अवघ्या जालना शहराचे डोळे लागले आहेत. विष्णूअस्त्र चालणार की 'महावीर' आपली विजयी घोडदौड कायम राखणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

लाडकी बहीण' उपक्रम महिलांच्या सशक्तीकरणाचा भक्कम आधार

## रांगोळीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे प्रभावी दर्शन - आमदार लोणीकर




**मंठा । प्रतिनिधी -** मंठा येथे ‘लाडकी बहीण’ उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी व सेल्फी स्पर्धेला महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत तब्बल १०३९ महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरवले. महिलांच्या कला, विचारशक्ती व सामाजिक भानाचे प्रभावी दर्शन या स्पर्धेतून घडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन सौ. मंदाताई बबनराव लोणीकर व सौ. दिव्या राहुल लोणीकर यांच्या शुभहस्ते पार पडले. तर बक्षीस वितरण समारंभ माजी मंत्री आमदार श्री. बबनराव लोणीकर व भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री. राहुल लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला.

**सामाजिक व राष्ट्रीय विषयांवरील रांगोळ्यांनी वेधले लक्ष**

रांगोळी स्पर्धेत महिलांनी समाजप्रबोधन करणाऱ्या विविध विषयांवर आधारित रांगोळ्या साकारल्या. **पान २ वर**

## जालना शहरात भाजपाला खिंडार गेंदालाल झुंगे यांचा समर्थका सहशिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश




**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील भारतीय जनता पक्षाचे गेंदालाल झुंगे यांनी त्यांच्या समर्थकासह आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे जालना शहरातील प्रभाग क्रमांक २ मधिल शिवसेनेची ताकद अधिक भक्कम झाल्याचे चित्र आहे.यामचळे या प्रभागातील शिवसेनेचा उमेदवार निवडून येण्यास प्रचंड ताकद मिळालेली आहे.

यावेळी श्री. झुंगे यांनी प्रभाग क्रमांक २ मधील तसेच जालना शहरातील शिवसेनेच्या नगरसेवक पदाच्या अधिकृत उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिलाअसुन त्यांचा जोमाने प्रचार करणार असल्याचे सांगितले. येणाऱ्या महापालिका निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवारांच्या विजयासाठी पूर्ण ताकदीने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या पक्षप्रवेश कार्यक्रमास शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे यांच्यासह शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी, स्थानिक नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्री. झुंगे यांचे शिवसेनेत स्वागत करून त्यांना पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा पक्षप्रवेश आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेसाठी महत्त्वाचा मानला जात असून जालना शहरातील राजकीय समीकरणांवर त्याचा सकारात्मक परिणाम होईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

जालना मनपा निवडणूक

## ‘महा-गोंधळ’: कुणाच्या हाती झेंडा अन् कुणाच्या गळ्यात कॅलेंडर?

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याच्या हवेत सध्या धूळ कमी आणि निवडणुकीचा गुलालच जास्त उडताना दिसतोय. निवडणूक आयोगाने प्रभाग रचनेचा जो काही 'साचा' टाकलाय, त्यात मतदार राजा असा काही अडकलाय की त्याला स्वतःच्या घराचा पत्ता सापडेल पण आपला नेमका उमेदवार कोण, हे शोधायला गुगल मॅपची मदत घ्यावी लागत आहे.

**चिन्हांची 'खिचडी' आणि मतदारांची 'भंबेरी'**

एका प्रभागात चार-चार मते द्यायची असल्याने मतदारांना आता गणिताच्या जास्तीच्या शिकवणी लावण्याची वेळ आली आहे. कुणाकडे 'तुतारी' आहे, तर कुणाचं 'घड्याळ' वाजतंय. 'मशाली'ची धग लागतेय न लागते तोच 'कमळ' फुलवण्याचे दावे होत आहेत. त्यात 'धनुष्य' घेऊन निघालेले शिकारी आणि 'हाताची' साथ मागणारे नेते पाहून मतदार म्हणतोय- बाबांनो, मत द्यायला बोटं दहाच आहेत, एवढी चिन्हं कुठं शोधू?

या सगळ्यात अपक्ष उमेदवारांनी तर कमाल केलीय. कुणी 'गॅस सिलिंडर' घेऊन फिरतंय, तर कुणी 'झाडू' मारतंय. कुणी 'पेन' घेऊन विकासाची गाथा लिहायला निघालंय, तर कुणी 'नारळ' फोडून विजयाचा नवस बोलतंय.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावन्नकुळे जालन्यात आले आणि एक अजब सल्ला देऊन गेले- १५ तारखेला लवकर झोपा आणि सकाळी लवकर उठा. आता जालनाकर संभ्रमात पडले आहेत. जर १५ ला झोपलो आणि कुंभकर्णासारखी झोप लागली, तर थेट १६ लाच जाग येईल! मग मतदानाचा हक्क काय स्वप्नात बजावायचा का? असा सवाल सामान्य जनता विचारत आहे. नेत्यांच्या या 'लॉजिक'मुळे कार्यकर्त्यांनी आता अलार्म घड्याळांची मोठ्या प्रमाणावर खरेदी सुरू केली आहे.




**सकाळी 'यांचा' प्रचार, संध्याकाळी 'त्यांचा' प्रचार!** **पान २ वर**

## राष्ट्रमाता जिजाऊंच्या विचारांचा वारसा चालवण्यासाठी घड्याळाला मत द्या; साथ द्या

### रिंकल उर्फ सुनिता तायड यांचे भावनिक आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रमाता जिजाऊ यांनी समाजाला दिलेले संस्कार, नारीशक्तीचा सन्मान आणि स्वराज्याची मूल्ये आजही तितकीच प्रेरणादायी असून, त्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी एकत्र येऊन साथ द्यावी, असे भावनिक आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार रिंकल उर्फ सुनिता तायड यांनी केले.

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १४ येथील प्रचार कार्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महिलांशी संवाद साधताना रिंकल उर्फ सुनिता तायड यांनी राष्ट्रमाता जिजाऊंच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडवताना समाजघडणीचा भक्कम पाया घातला. आजच्या काळात त्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवत आहे, असे त्या म्हणाल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने रिंकल उर्फ सुनिता भगवान तायड या घड्याळ या निवडणूक चिन्हावरून प्रभाग क्रमांक १४ मधून निवडणूक लढवीत असून, त्यांच्या प्रचार कार्यालयात जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विधानसभा अध्यक्ष प्रतापराव शिंदे, विजय भावले, राहुल लष्कर, आकाश राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिला सशक्तीकरण, युवकांना योग्य दिशा, सामाजिक न्याय, शिक्षण तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम असावे, हीच राष्ट्रमाता जिजाऊंच्या विचारांची खरी शिकवण आहे, असेही त्या म्हणाल्या. या प्रसंगी उपस्थित महिलांनी आणि तरुणांनी त्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत जाहीर पाठिंबा दिला. जिजाऊंच्या विचारांवर चालणारे नेतृत्व म्हणून रिंकल उर्फ सुनिता तायड यांना साथ देण्याचे आवाहन नागरिकांकडून करण्यात आले.

कार्यक्रमास पुष्पा चव्हाण, ज्योती गायकवाड, उषा डोंगरदिवे, संगीता चीलकवार, सुनिता डोंगरदिवे, प्रांजल राठोड, भक्ती चव्हाण, राधा ठोसर, मनीषा प्रजापती, सुवर्णा जाधव, शिवनंदा काळे, संगीता डेरे, सीमा लोणगे, प्रभा ठोकळे, कावेरी शिंदे, लक्ष्मी कोल्हे, सरला पाटील, लीलावती डोळस, अर्चना शेवाळे यांच्यासह अनेक महिला व नागरिक उपस्थित होते




भास्कर दानवे यांच्या झंजावाती प्रचाराने विरोधक हादरले

## विकासाच्या जोरावर प्रभागातील पाचही उमेदवार विजयी होणार - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १ मध्ये भारतीय जनता पक्षाचा जोरदार प्रचार सुरू असून, भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या झंजावाती प्रचारामुळे विरोधकांच्या गोटात खळबळ उडाली आहे. गल्लीबोळात जाऊन मतदारांशी थेट संवाद, बैठका, पदयात्रा आणि घराघरात भेटी देत भास्कर दानवे यांनी प्रचारात प्रचंड वेग आणला आहे.

प्रभाग क्र. १ मध्ये भाजपच्या माध्यमातून आतापर्यंत करण्यात आलेल्या रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्ट्रीट लाईट, स्वच्छता तसेच नागरी सुविधांच्या भरीव विकासकामांचा आढावा घेत मतदारांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, विकास हाच आमचा अजेंडा आहे. केलेल्या कामांच्या जोरावर भाजपाचे पाचही उमेदवार निश्चितपणे विजयी होतील. प्रभागातील अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करून नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यासाठी भाजपला पुन्हा संधी द्यावी.

जालना शहराचा महापौर भाजपचा व्हावा, यासाठी सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. केंद्र आणि राज्यात भाजपचे सरकार असल्यामुळे महानगरपालिकेवरही भाजपची सत्ता आली तर निधी आणि विकासकामांना अधिक गती मिळेल. त्यामुळे जालना शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी ही सुवर्णसंधी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

भास्कर आबा दानवे यांनी प्रभाग क्रमांक १ सोबतच शहरातील इतर प्रभागांमध्येही प्रचार दौरे करत नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. रस्त्यांची दुरवस्था, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, महिलांसाठी सुविधा, युवकांच्या रोजगाराचे प्रश्न यावर सकारात्मक उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. प्रचारादरम्यान त्यांनी भाजप सरकारच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना दिली. घरकुल योजना, पंतप्रधान आवास योजना, उज्ज्वला योजना, मोफत धान्य योजना, आरोग्य विमा योजना, शेतकरी सन्मान निधी अशा योजनांचा उल्लेख करत या योजनांचा थेट लाभ सर्वसामान्यांना झाल्याचे सांगितले.

या वेळी प्रभाग क्र. १ मधील भाजपाचे उमेदवार भास्कर आबा दानवे, कल्याण भदनेकर, ज्योती सले, सुशीला दानवे, पद्मा मानधनी यांच्यासह अमोल कारंजेकर, सुभाष सले, कपिल दहेकर, नारायण पवार, गंभीर पडूळ आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

भास्कर दानवे यांच्या जोशपूर्ण प्रचारामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, विरोधकांमध्ये मात्र धास्ती पसरली आहे.

# संपादकीय

## तिळगुळ घ्या... गोड गोड बोला..!

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पान १ वरुन

### रांगोळीच्या माध्यमातून ...

देशभक्ती, राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज, राम मंदिर, ऑपरेशन सिंदूर, महिलांवरील अत्याचार, लहान मुलांवर सोशल मीडियाचा होणारा दुष्परिणाम अशा अनेक सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय विषयांवर महिलांनी आपल्या कलेतून प्रभावी संदेश दिला. या रांगोळ्यांमधून महिलांचे सामाजिक भान, संवेदनशीलता व विचारप्रवृत्ती ठळकपणे दिसून आली. स्पर्धेचे परीक्षण दीपक दीक्षित, रणजीत सोळुंके, अर्चना तनपुरे, वर्षा सोळंके व डॉ. अनुजा बिनगे यांनी अत्यंत काटेकोरपणे केले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, 'लाडकी बहीण' उपक्रम म्हणजे महिलांच्या सशक्तीकरणाचा खऱ्या अर्थाने आधार आहे. महिलांनी घराबाहेर येऊन आपल्या कलेच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणे ही आजची गरज आहे आणि आजच्या रांगोळी स्पर्धेतून ते प्रभावीपणे दिसून आले आहे. ते पुढे म्हणाले की, महिलांनी सामाजिक प्रश्नांवर मांडलेले विचार अत्यंत प्रेरणादायी आहेत. महिला सक्षम झाली तर कुटुंब सक्षम होते, कुटुंब सक्षम झाले तर समाज सक्षम होतो आणि समाज सक्षम झाला तर देश सक्षम होतो, असे ठाम प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. आमदार लोणीकर यांनी उपस्थित लाडक्या बहिणींना आश्वासन देताना सांगितले की, महिलांचे शिक्षण, सुरक्षितता, रोजगार, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेसाठी शासन व लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही नेहमी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू. भविष्यातही महिलांसाठी असे सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक उपक्रम सातत्याने राबवले जातील. कार्यक्रमाच्या शेवटी एकूण १०४ बक्षिसांचे वितरण करण्यात आले. रांगोळी स्पर्धेतील प्रथम बक्षीस स्कुटी सौ. वंदना वैजनाथ बोराडे यांच्यावतीने देण्यात आले. तसेच दुसरे बक्षीस ४ फ्रिज - सौ. स्नेहा अजय अवचार तिसरे बक्षीस ४ वॉशिंग मशीन - सौ. भारती दौलत शहाणे चौथी बक्षीस २१ मिक्सर - सौ. उर्मिला बाळासाहेब तौर पाचवे बक्षीस २१ कुकर - सौ. चंद्रभागा विठ्ठलराव काळे सहावे बक्षीस २१ डिनर सेट - सौ. उर्मिला सुरेश सरोदे सातवे बक्षीस ११ इलेक्ट्रिक शेगडी - सौ. दुर्गा गणेश बोराडे तसेच सेल्फी स्पर्धेसाठी स्वतंत्रपणे २१ पैठणींची बक्षिसे श्री. भूषण कासट (राजेश वस्त्र भंडार) यांच्या सौजन्याने देण्यात आली. तसेच कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य सौ. शितल शरद मुरक्या यांनी केले.

कार्यक्रमास राहुल लोणीकर, मंदाताई लोणीकर, दिव्या लोणीकर, अंकुशराव बोराडे, अंकुशराव अवचार, बाबुराव शहाणे, सतीशराव निर्वळ, नितीन राठोड, गणेशराव खवणे, शिवाजीराव खंदारे, पंजाबराव बोराडे, संपत टकले, विठ्ठलराव काळे, शिवाजीराव जाधव, अमोल मोरे, राजाभाऊ खराबे, नागेशराव घारे, पंजाबराव पुणेकर, रावसाहेब बाहेकर, विष्णुपंत बाहेकर, माऊली गुंडगे, पांडुरंग चव्हाण, वैभव नरवडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आयोजक, सहप्रायोजक, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### महा-गोंधळ कुणाच्या ...

जालन्याच्या रस्त्यांवर सध्या एक विचित्र दृश्य दिसतंय. सकाळी एखादा कार्यकर्ता हातात एका पक्षाचा झेंडा घेऊन 'झिंदाबाद'च्या घोषणा देताना दिसतो, तोच कार्यकर्ता संध्याकाळी दुसऱ्या पक्षाच्या कोपरा सभेत चहा-वडापावचा आनंद घेताना दिसतो. हे कार्यकर्ते आहेत की 'डेली वेजेस'वर आणलेली भाडोत्री फौज, हे ओळखणं कठीण झालंय. सकाळी कमळ, दुपारी घड्याळ, संध्याकाळी मशाल अन् रात्री जो देईल 'पाकीट' त्याच्यावर आमची माया विशाल! - अशीच काहीशी अवस्था या 'उसण्या' कार्यकर्त्यांची झाली आहे. उमेदवार दारात आला की मतदार मोठ्या प्रेमाने त्याचं स्वागत करतो. भावी नगरसेवक साहेब, यंदा तुमचंच काम! असं आश्वासन प्रत्येक उमेदवाराला मिळतंय. परिणामी, प्रत्येक प्रभागात किमान १० ते १२ 'भावी नगरसेवक' छाती ठोकून फिरत आहेत. पण मतदाराच्या मनात काय चाललंय, हे मात्र कोणालाच कळेना. जालनाकर जनतेने यंदा बोलघेवड्या नेत्यांना मौनव्रताने उत्तर देण्याचे ठरवलेले दिसते. थोडक्यात काय तर... जालना मनपाची ही निवडणूक म्हणजे विकासाचा मुद्दा कमी आणि चिन्हांचा 'गोंधळ' जास्त अशी झाली आहे. आता तुतारी वाजणार की धनुष्य लागणार, कमळ फुलणार की हात उंचावणार, हे पाहण्यासाठी जालनाकरांना त्या 'पंधरा' तारखेच्या झोपेतून जागे व्हावेच लागेल!

## मुलींना व्यवसाय, रोजगारांच्या अनेक संधी, पारंपरिक चौकट सोडून नव्या विचारांचा अंगिकार करण्याची गरज - सुधाकर शेंडगे




**जालना । प्रतिनिधी -** बदलत्या काळात महिला, मुलींसाठी व्यवसाय, रोजगारांच्या अनेक संधी विविध क्षेत्रात उपलब्ध आहेत. पारंपरिक विचार सोडून नवे विचार स्वीकारल्यास विकासाच्या अनेक संधी आज आपल्या समोर उभ्या आहेत. पारंपरिक शिक्षणासोबत व्यावसायिक कौशल्य आत्मसात करून मुलींनी स्वावलंबी व्हावे असे आवाहन डॉ. सुधाकर शेंडगे यांनी व्यक्त केले. येथील श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेंसमेण्ट कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष महेंद्रकुमार गुप्ता तर प्रमुख पाहुणे म्हणून कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, प्रशासकीय अधिकारी डॉ विद्या पटवारी, प्रभारी प्राचार्य डॉ जितेंद्र अहिरराव,डॉ.विजय नागोरी, डॉ. स्वाती महाजन, प्रा. पार्वती देशमुख यांची उपस्थिती होती. मुलींना वेगवेगळ्या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. आपल्या वेळेचे सदुपयोग करून आपले आजचे काम अधिकाधिक चांगले करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मिळालेल्या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे असे मत संस्थेचे अध्यक्ष महेंद्रकुमार गुप्ता यांनी व्यक्त केले. विविध व्यावसायिक संधीकडे सकारात्मक दृष्टिकोन बाळगून बघायला हवे. नोकरी पेक्षा व्यवसायात विकासाच्या जास्त संधी आहेत. व्यवसायात यश मिळवण्यासाठी मेहनत आणि प्रयत्नातील सातत्य खूप महत्वाचे ठरतात असे कोषाध्यक्ष संजय अग्रवाल म्हणाले. प्रशासकीय अधिकारी डॉ विद्या पटवारी, प्रभारी प्राचार्य डॉ जितेंद्र अहिरराव यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या दुस-या सत्रामध्ये एस् .एम. वानगोता यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.विजय नागोरी, कार्यशाळेचे उद्घाटक डॉ. सुधाकर शेंडगे यांचा परिचय हिंदी विभागप्रमुख प्रा.पार्वती देशमुख, सूत्रसंचालन प्रा. साईलीला पारीक यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अंकित गायकवाड यांनी केले. कार्यशाळेत महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

## कृषी केंद्रात युरियाचा तुटवडा पिकाची वाढ खुंटली; शेतकरी चिंतेत

**दिंडोरी । प्रतिनिधी -** खरिपाच्या हंगामातील पिकांची वाढ चांगल्या पद्धतीची व्हावी याकरिता युरियाची गरज असताना शेतकऱ्यांना ते मिळेनासे झाले आहे,त्यात कृत्रिम टंचाई निर्माण होत असल्याने शेतकरी वैतागला आहे,त्यातच लिंकिंगने पद्धतीने डोके वर काढल्याने शेतकऱ्यांची डोकेदुखी मध्ये भर पडत आहे, दुहेरी संकटात शेतकऱ्याला अडकविण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे,खत कंपन्यांच्या लिंकिंगमुळे दुकानदारही अडचणीत सापडले आहेत,त्यांनी लिकिंगच्या सक्तीमुळे युरियाच ठेवणे बंद केले आहे,कृषी विभागाने शेतकऱ्यांच्याप्रती अधिक सजग होऊन युरियाचे संकट दूर करावे अशी मागणी करण्यात आली आहे,खरीप हंगामातील मका,सोयाबीन, यांसह कडधान्य ही पिके वाढीच्या अवस्थेत आहेत,त्यांची उंची जोमाने व्हावी, यासाठी शेतकरी युरिया दिंडोरी तालुक्यात युरियाच्या टंचाईमुळे गहू पिकाची वाढ खुंटली आहे.

खते खरेदी करण्यास दुकानदारांनी युरियाची खरेदी करण्यास नकार दिला आहे.

युरियाचा तुटवडा असल्याने चिंतेत वाढ झाली आहे. शेतकरी दररोज गावातील दुकानात जातो, परिसरात



दुकानदारांचा नकार- युरियाच्या ५० किलो गोणीची किंमत २६६ रुपये आहे. त्यासाठी २० रुपये भाडे घेतले जाते,त्यातच खत कंपन्या दुकानदारांना लिंकिंग म्हणून त्याच्या दुप्पट किमतीची अन्य खते, तणनाशके देतात त्यामुळे ग्रामीण भागातील जाऊन चौकशी करतो, परंतु त्याला नकार मिळत असल्याने तो नाराज होऊन शिवारात परतत आहे, त्यातच नुकतीच लागवड झालेल्या उसाला युरिया देण्याची गरज असताना खतांचा डोस देऊ शकले नाही, गेली महिनाभर जिल्ह्यातील ग्रामीण भागात ही स्थिती निर्माण झाली आहे. दुकानात युरिया नसल्याने माघारी परतावे लागते, गहू, हरभरा, मका आदी पिकांसह भाजीपाला पिकांना युरिया खताची नितांत आवश्यकता आहे, मात्र दुकानांमध्ये युरिया शिल्लक नसल्याने माघारी परतावे लागते, शासनाने शेतकऱ्यांना लवकरात लवकर युरिया उपलब्ध करून द्यावा अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल

**- विलास भागवत ज्येष्ठ शिवसैनिक वरखेडा**

दिंडोरी तालुक्यात मागणी वाढल्याने युरियाची टंचाई होत आहे, ज्यादा दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कार्यवाही करण्यात येईल, जिल्हास्तरावरून युरियाची मागणी करण्यात आली आहे

**- नानाजी भोये, तालुका कृषीअधिकारी दिंडोरी**

जालना महानगरपालिका निवडणूक २०२६ : प्रभाग क्रमांक १० व ११ मध्ये शिवसेनेची भव्य विराट सभा

## आमदार अर्जुनराव खोतकर यांचा विकास आराखड्याचा लेखाजोखा

### माजी मंत्री अब्दुल सत्तार यांचे शिवसेना उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन






**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १० व ११ मध्ये शिवसेना पक्षाच्या वतीने भव्य विराट जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या जाहीर सभेला माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार साहेब आणि शिवसेना उपनेते तथा अंदाज समिती प्रमुख आमदार अर्जुनराव खोतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या सभेत प्रभाग क्रमांक १० व ११ मधील शिवसेना पक्षाचे अधिकृत व लोकप्रिय उमेदवार यांच्या प्रचाराचा शुभारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभलेल्या या सभेत शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला.

याप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जालना विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी तयार केलेल्या विकास आराखड्याची सविस्तर माहिती दिली. जालना शहरातील विविध भागांमध्ये करण्यात आलेल्या रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, सांस्कृतिक सभागृह, कचरा व्यवस्थापन आदी विकासकामांचा लेखाजोखा त्यांनी नागरिकांसमोर मांडला. विकास ही केवळ घोषणा नसून प्रत्यक्षात काम करून दाखवण्याची शिवसेनेची परंपरा असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती लाभलेले माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार साहेब यांनी आपल्या भाषणात जालना शहराच्या विकासासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांचे नेतृत्व सक्षम असल्याचे सांगितले. जालना शहराचा विकास अधिक वेगाने करण्यासाठी आपण सर्वांनी आमदार अर्जुन खोतकर यांचे हात बळकट करावेत आणि शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी उपस्थित नागरिकांना केले.

सभेत शिवसेना पक्षाच्या उमेदवारांची ओळख करून देण्यात आली.

प्रभाग क्रमांक ११ मधील उमेदवार पुढीलप्रमाणे -

अ - शेख फिरोजलाल शेख चुनुमिया तांबोळी

ब - सौ. शोभाताई राजाराम गायकवाड

क - सौ. केसरबाई संताजी वाघमारे

ड - अब्दुल सगीर अजीज शेख

प्रभाग क्रमांक १० मधील उमेदवार पुढीलप्रमाणे -

अ शहा आलम खा ( शिवसेना पुरस्कृत )

ब हिना जावेद शेख

क सादी अब्दुल कुरेशी

ड अमरदीप पांडुरंग शिंदे ( शिवसेना पुरस्कृत )

हे सर्व उमेदवार जनतेशी नाळ जोडलेले, काम करणारे आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी असणारे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

सभेत प्रभाग क्रमांक ११ मध्ये करण्यात आलेल्या ठोस विकासकामांची माहिती देण्यात आली. श्री आनंदी स्वामी महाराज सांस्कृतिक सभागृह, भूमिगत नाल्या, सिमेंट रस्ते, नवीन पाणीपुरवठा पाईपलाईन, नियमित टँकर पाणीपुरवठा, हातपंप दुरुस्ती व नवीन हातपंप, तसेच कचरा व्यवस्थापन व घंटागाडी सेवा ही प्रमुख कामे करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले.

गीतांजली कॉलनी, नॅशनल नगर, गुलशन नगर व प्रशांतिनाथ नगर परिसरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे करण्यात आल्याची माहिती देताना नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

मतदान दिनांक गुरुवार १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार असून, शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटन दाबून विकास, विश्वास व स्थैर्यासाठी मतदान करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## ग्रामपंचायत कार्यालय सावंगी तलाव येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** गट ग्रामपंचायत कार्यालय सावंगी तलाव येथे राजमाता जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक तथा सरपंच कमलाकर कळकुंबे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून,त्यांच्या कार्यास अभिवादन करण्यात आले.यावेळी कमलाकर कळकुंबे(सरपंच),परमेश्वर रंधवे (ग्रा.पं.सदस्य),अरुण गायकवाड(तंटामुक्ती अध्यक्ष),निखिल भंडारे(पोलीस पाटील),अजिंक्य कळकुंबे(युवा सेना),किशोर झोरे(शिवसेना नेते),संतोष राऊत,सखाराम मुळे (रोजगार सेवक),तुकाराम राठोड(पत्रकार), श्रीधर खराडे, सुनील आहेरकर (कॅम्पुटर ऑपरेटर), विठ्ठल जाधव,नारायण आहेरकर (ग्रा.पं.कर्मचारी) यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेना (शिंदे गट) कडून प्रभाग ४ आणि १० मधील पुरस्कृत उमेदवारांची घोषणा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. शिवसेना पक्षाच्या वतीने जालना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब एकनाथराव घुगे यांनी प्रभाग क्रमांक ४ आणि प्रभाग क्रमांक १० मधील अधिकृत पुरस्कृत उमेदवारांची घोषणा प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. पक्षाचे अधिकृत पुरस्कृत उमेदवार उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे यांच्या आदेशाने आणि माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली खालील उमेदवारांना पुरस्कृत करण्यात आले आहेः शहा आलम खान । प्रभाग १० (अ) । घड्याळ । अमरदीप पांडुरंग शिंदे । प्रभाग १० (ड) । पांगुळगाडा । कुणाल योगेश सामलेटी । प्रभाग ४ (ब) । चष्मा ।

## जालन्यात शिक्षक परिषदेचे १० वे रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न; २६ शिक्षकांचे रक्तदान



जालन्यात शिक्षक परिषदेचे १० वे रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न; २६ शिक्षकांचे रक्तदान

जालना: राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने रविवारी (११ जानेवारी) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २६ कार्यकर्त्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

ठळक वैशिष्ट्ये:

दशकमूर्ती उपक्रम: शिक्षक परिषदेचे हे सलग १० वे वर्ष होते.

उद्घाटन: राज्य नेते मा. श्री. बाबुराव पवार आणि राज्य महिला आघाडी प्रमुख मा. श्रीमती साधना गिऱ्हे यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून शिबिराचा प्रारंभ झाला.

स्थळ: शिक्षक पतसंस्था कार्यालय, भाग्यनगर, जालना.

रक्तदान करणाऱ्या दात्यांची नामावली:

या शिबिरात जगत श्रीराम घुगे, आप्पासाहेब मुळे, कृष्णा भवर, काशिनाथ आचलखांब, आजिनाथ शिरसाट, गणेश तांबेकर, दशरथ चाफलवाड, किरण कुलकर्णी, शरद कुलथे, जगन्नाथ शिंदे, बालाजी इर्ले, गणेश अन्नपवाड, विनोद राठोड, विकास पोथरे, एच.के. पठाण, निलेश सोमवंशी, अजयकुमार गायकवाड, अरुण किटाळे, सुनील साबळे, बाजीराव गाढवे, कपिलेश्वर ठोंबरे, किशोर अहिरराव, रविकांत जायभाये, सुनील खिल्लारे, संतोष देशपांडे आणि रामप्रभू मुंडे यांनी रक्तदान केले.

यांनी घेतले परिश्रम:

शिबिराच्या यशस्वीतेसाठी मंगेश जैवाळ, विकास पोथरे, जगन्नाथ शिंदे, रवी तारो, सुनील साबळे, संतोष देशपांडे यांच्यासह शिक्षक परिषदेचे पदाधिकारी आणि महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख नीता पाटील, स्वाती पाटील व अन्य सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

शिक्षकी पेशासोबतच सामाजिक ऋणाची जाणीव ठेवून दरवर्षी हे शिबिर आयोजित केले जाते, ही भूषणावह बाब आहे.

## प्रभाग क्र. ९ मध्ये राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी



**जालना । प्रतिनिधी -** प्रभाग क्रमांक ९ मधील शिवसेना कार्यालयात राजमाता राष्ट्रमाता माँ साहेब जिजाऊ यांची जयंती उत्साहात, भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. स्वराज्य जननी जिजाऊ माँसाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या गौरवशाली स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रभाग ९ चे शिवसेनेचे उमेदवार विष्णु पाचफुले, शुभम टेकाळे यांच्यासह भुतेकर, मेघराव चौधरी व परिसरातील नागरिक, शिवसैनिक आणि महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यालयातील मुख्य कार्यक्रमात जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

### महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६

# ‘दुबार’ मतदारांवर प्रशासनाची करडी नजर; मतदान केंद्रावर ‘परिशिष्ट-२’ भरणे अनिवार्य

### अंतिम मतदार यादीत फेरबदलाचे अधिकार नाहीत; पारदर्शक मतदानासाठी प्रशासनाकडून 'दुबार'चे शिक्के मारण्याची मोहीम

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून, मतदानामध्ये पारदर्शकता राखण्यासाठी 'दुबार' मतदारांबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या २९ ऑक्टोबर २०२५ च्या सूचनेनुसार कडक कार्यवाही करण्यात येत आहे. ज्या मतदारांची नावे एकापेक्षा जास्त ठिकाणी आहेत, अशा मतदारांची ओळख पटवून त्यांच्या नावापुढे 'दुबार' असा शिक्का मारण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

मतदार यादीबाबत स्पष्टीकरण:

निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे की, १ जुलै २०२५ रोजीच्या विधानसभा मतदार यादीच्या आधारावरच ही निवडणूक होत आहे. त्यामुळे विधानसभा यादीत नवीन नाव समाविष्ट करणे किंवा नावांत दुरुस्ती करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त अथवा राज्य निवडणूक आयोगास सध्याच्या टप्प्यावर नाहीत. राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभागनिहाय अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर, आयोगाकडूनच प्राप्त झालेल्या दुबार नावाच्या यादीनुसार ही विशेष मोहीम राबवण्यात आली आहे.

अशी राबवण्यात आली मोहीम:

तहसील कार्यालयाचे निवडणूक नायब तहसीलदार आणि त्यांचे सर्व सहकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इड्ज) तसेच पर्यवेक्षक यांची नियुक्ती करून प्रत्यक्ष सर्वे करण्यात आला. या सर्वे क्षणाअंती:

मतदार चिठ्ठी (झेश्रश्र उहळीं): मतदारांना वाटप करण्यात येणाऱ्या चिठ्ठ्यांवर 'दुबार मतदार' असा स्पष्ट शिक्का मारण्यात आला आहे.

चिन्हांकित प्रत: मतदान केंद्रावरील अधिकृत मतदार यादीतही अशा मतदारांच्या नावापुढे 'दुबार' अशी नोंद करण्यात आली आहे.

मतदानासाठी 'परिशिष्ट-२' ची अट:

ज्या मतदारांच्या नावावर 'दुबार' असा शिक्का मारण्यात आला आहे, असे मतदार जेव्हा मतदान केंद्रावर जातील, तेव्हा त्यांना थेट मतदान करता येणार नाही. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, अशा मतदारांना आपली ओळख पटवण्यासाठी आणि आपण अन्य कोठेही मतदान केले नसल्याची खात्री देण्यासाठी 'परिशिष्ट-२' (पपर्शुीश-२) हा नमुना अर्ज भरून द्यावा लागेल. त्यानंतरच त्यांना मतदानाचा हक्क बजावता येईल.

प्रशासनाचा इशारा:

एकाच व्यक्तीने दोन वेगवेगळ्या ठिकाणी मतदान करण्याचा प्रयत्न केल्यास, तो निवडणूक कायद्यानुसार गुन्हा ठरेल. अशा व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिले आहेत. मतदारांनी गोंधळून न जाता आपल्या नावापुढील नोंदी तपासाव्यात आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

- निवडणूक विभाग, जालना शहर महानगरपालिका

# ब्राम्हण समाजाच्या नावाखाली दिशाभूल करणाऱ्या ‘राजकीय कंत्राटदारांपासून’ सावधान

### सकल ब्राम्हण समाजाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** ब्राम्हण समाजाचे प्रतिनिधित्व करण्याचा खोटा दावा करून समाजाची दिशाभूल करणाऱ्या आणि राजकीय स्वार्थ साधणाऱ्या घटकांपासून समाज बांधवांनी सावध राहावे, असे जाहीर आवाहन 'सकल ब्राम्हण समाजा'च्या वतीने करण्यात आले आहे. काही विशिष्ट व्यक्ती स्वतःला समाजाचे 'कंत्राटदार' समजून राजकीय पक्षांकडे समाजाची सौदेबाजी करत असल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला आहे.

**दिशाभूल करणारे संदेश आणि खोटा दावा**

गेल्या काही दिवसांपासून समाजमाध्यमांवर (Social Media) काही संदेश प्रसारित होत आहेत. यामध्ये ब्राम्हण समाज विशिष्ट पक्षावर नाराज असून त्यांनी राजकीय निर्णय घेतल्याचे भासवले जात आहे. मात्र, सकल ब्राम्हण समाजाने स्पष्ट केले आहे की, समाजाची अशी कोणतीही अधिकृत मीटिंग किंवा सभा झालेली नाही. तसेच, भारतीय जनता पक्षाला मत देऊ नये, असा कोणताही ठराव समाजाकडून मंजूर करण्यात आलेला नाही.

तिकीट वाटपावरून राजकारण

निवेदनात नमूद केल्यानुसार, काही विद्रोही घटक तिकीट वाटप प्रक्रियेचा चुकीचा अर्थ लावून समाज मानस बिघडवण्याचे काम करत आहेत. प्रत्यक्षात ज्या प्रभावी कार्यकर्त्यांनी उमेदवारी मागितली होती, ते नाराज नसून पूर्ण निष्ठेने पक्षाचा प्रचार करत आहेत. असे असतानाही, काही जण केवळ स्वतःच्या 'पोळ्या भाजून घेण्यासाठी' समाजाचा वापर करत असून त्यांनी अन्य पक्षांकडे जाऊन पदे पदरात पाडून घेतली आहेत, अशी टीका निवेदनात करण्यात आली आहे.

पारंपारिक मतदानाचे आवाहन

ब्राम्हण समाजाने कोणत्याही संभ्रमात न राहता आपले 'पारंपारिक मतदान' मुक्तपणे करावे, अशी विनंती निवेदकांकडून करण्यात आली आहे. समाजाच्या वतीने राजकीय निर्णय घेण्याचे अधिकार कोणत्याही ठराविक व्यक्तीला किंवा कंत्राटदाराला दिलेले नाहीत, हेही यावेळी ठामपणे सांगण्यात आले.

निवेदकांमध्ये मान्यवरांचा समावेश

या निवेदनावर समाजातील विविध स्तरांतील ७० हून अधिक मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील व्यक्तींचा समावेश आहे:

पुरोहित संघ, विनायक महाराज फुलंब्रीकर, श्रीकांत शेलगांवकर.

ॲडव्होकेट: श्रीकांत देशपांडे, नरेंद्र देशपांडे (जाफ्राबादकर), सुनिल किंनगावकर, विपुल देशपांडे.

डॉक्टर: सतिशचंद्र प्रभु, प्रकाश सिगेदार, पद्माकर सबनिस, भारत कुलकर्णी.

महिला प्रतिनिधी: सौ. शुभांगी देशपांडे, सौ. दिपाली बिन्नीवाले, सौ. रोहीणी टाकळकर, सौ. अमृता पाटील, श्रीमती विद्या देशमुख आणि इतर.

इतर: प्रा. एस.व्ही. देशपांडे, एम.जी. जोशी, रामराव जोशी, अतुल वझरकर आणि अनेक प्रतिष्ठित नागरिक.




# धन्य धन्य मॉ जिजाऊ... युगानु युगे गुण तुझे गाऊ...

## घोषणांनी आसमंत दणाणला; अभिवादन सोहळा: सर्वपक्षीय उत्सव समितीतर्फे दुचाकी रॅली, सामूहिक वंदना, पुरस्कार वितरण





**जालना । प्रतिनिधी -** स्वत्व गमावलेल्या समाजाला आत्मभान देऊन मना- मनांत स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविणाऱ्या स्वराज्य प्रेरिका,राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ मॉ. साहेब यांची ४२८ वी जयंती सोमवारी ( ता.१२) जालना शहरात सर्व पक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्या वतीने उत्साह व जल्लोषात साजरी करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराज पुतळा येथे अभिवादन सोहळा, मातृशक्तीचा सन्मान, हातात भगवे ध्वज घेऊन राजमाता मॉ. जिजाऊ चौकापर्यंत निघालेल्या दुचाकी रॅलीत महिला व युवकांचा लक्षणीय सहभाग होता. रॅली दरम्यान जय जिजाऊ,,,जय शिवराय... राष्ट्रमाता, राजमाता, जिजाऊ मॉ साहेबांचा विजय असो..छत्रपती शिवाजी महाराज की जय,,,,,छत्रपती संभाजी महाराज की जय,,, तुमचं -आमचं नातं काय..जय जिजाऊ,,जय शिवराय ..! अशा गगनभेदी घोषणा देत शिवप्रेमींनी संपूर्ण शहराचा आसमंत दणाणून सोडला.

मॉ. जिजाऊ जन्मोत्सवा निमीत्त सर्व पक्षीय जयंती उत्सव समिती च्या वतीने सकाळी छत्रपती संभाजी महाराज पुतळा परिसरात मराठा महासंघाचे राष्ट्रीय विभागीय चिटणीस अरविंद देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सामूहिक जिजाऊ वंदना व अभिवादन सोहळा घेण्यात आला. यावेळी आ .अर्जुनराव खोतकर,प्रा. डॉ.सोपानराव तेलगड,इकबाल पाशा, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर,अक्षय गोरंट्याल, उत्सव समितीचे अध्यक्ष योगेश सोळंके,समितीचे कार्याध्यक्ष अर्जुन गायकवाड,सचिव अर्जुन घारे, उपाध्यक्ष व्यंकटेश भगत, गणेश कापसे, मराठा क्रांती मोर्चा चे अशोक पडूळ,भरत मानकर,सागर पाटील,ड. शैलेश देशमुख, गणेश सूपारकर,मंगेश मोरे, आण्णा गायकवाड, गोविंद चित्राल, यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकात समितीचे अध्यक्ष योगेश सोळंके यांनी संकटांचा सामना करण्याची प्रेरणा राष्ट्रमाता, राजमाता, मॉ.जिजाऊ यांच्या चरित्रातून मिळते. असे सांगून समिती तर्फे गौशाळेत चारा वाटप सह सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

प्रारंभी माँ. जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजन करून सामूहिक जिजाऊ वंदना घेण्यात आली.सूत्रसंचालन किरण देशमुख यांनी केले तर समिती कार्याध्यक्ष अर्जुन गायकवाड यांनी आभार मानले.

### जिजाऊ गौरव पुरस्कार....!

याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गायत्री सोरटी. निमा घनगाव,आरती जाधव, रीता अग्रवाल. सोनम गुंजमूर्त ,निकिता चव्हाण. किरण मसुरे ,खुशी उगले,कल्पना ठाकूर,वैष्णवी पळसकर, मयुरी नावडकर, सुनिता सवांगे यांना जिजाऊ गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

खा.डॉ.कल्याण काळे यांनी रॅली दरम्यान भेट देऊन अभिवादन केले. सजवलेल्या रथात मॉ जिजाऊ यांची प्रतिमा, डि. जे .वर युगानुयुगे गुण तुझे गाऊ,,, धन्य,, धन्य मॉ जिजाऊ ,,, माझ्या जिजाऊंची पुण्याई..., अशी रोमांचक गीते, हातात भगवे ध्वज घेऊन निघालेल्या दुचाकी रॅलीने शहरवासीयांचे लक्ष वेधले. रॅली मार्गावर येणाऱ्या सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. कचेरी रोड, शनिमंदिर, गांधी चमन, मस्तगड,सुभाष चौक, महावीर चौक, मामा चौक, सिंधी बाजार, फुल बाजार, बडी सडक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर मार्गे जात राजमाता मॉ जिजाऊ चौक येथे रॅलीचा समारोप झाला.शिवभक्तांनी मातृतीर्थ सिंदखेडराजा कडे प्रस्थान केले.

### संस्कार राष्ट्रभक्ती नेतृत्वाचा संगम - आ.खोतकर

हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या प्रेरिका राष्ट्रमाता, राजमाता ,मॉ .साहेब जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराज ,छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर राष्ट्रभक्तीचे संस्कार केले. संस्कार, राष्ट्रभक्ती, नेतृत्व गुणांचा संगम त्यांच्या आत्मचरित्रातून प्रत्येकाने घेतला पाहिजे असे प्रतिपादन आ. अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी शुभेच्छा देताना केले. छत्रपती शिवरायांसारखे महान रत्न घडवतांना राष्ट्रमाता, मॉ .जिजाऊ यांनी मैदान आणि रणांगणावरील युद्धकलेचे धडे बालपणीच शिवबांना दिले होते. परिणामी जनता एकसंघ राहिली ती एकात्मता आजपर्यंत टिकून असल्याचे अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले.

### जालना शहरात स्मारक व्हावे - देशमुख

राष्ट्रमाता जिजाऊंचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे याकरिता सर्व सामाजिक संघटना सक्रिय आहेत. मातृतीर्थ सिंदखेडराजा जवळच असल्याने महाराष्ट्राचे केंद्रबिंदू असलेल्या जालना शहरात मॉ.जिजाऊ यांचे स्मारक झाले पाहिजे अशी मागणी अरविंद देशमुख यांनी यावेळी केली. आम्ही कोणत्याही राजकीय पक्षाचे नाही. परंतु राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवराय व महापुरुषांचे विचार घेऊन कार्यरत आहोत आणि याच विचारांचा झेंडा फडकल्यास निश्चित सर्व कार्य मार्गी लागतील असा विश्वास अरविंद देशमुख यांनी व्यक्त केला.

# जालना महापालिका भाजपाच्या ताब्यात द्या; मराठवाड्यात नंबर एकची महानगरपालिका बनवू - रावसाहेब दानवे




**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पार्टीला महापालिकेची संधी द्या, आम्ही जालना महानगरपालिकेला मराठवाड्यात नंबर एकची महानगरपालिका बनवून दाखवू असे आवाहन माजी केंद्रीय मंत्री व खासदार रावसाहेब पाटील दानवे यांनी आज गांधी चमन येथील प्रचार सभेत केले.

जालना शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, आ.नारायणभाऊ कुचे, आ.संतोष पाटील दानवे, निवडणूक प्रमुख कैलास गोरंट्याल, भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या सह प्रभाग क्र.९ चे अधिकृत उमेदवार सौ. मंगल नंदकिशोर गरदास, सौ. संध्या संजय देठे, महावीर रामकुमार ढक्का, विक्रांत महावीर ढक्का, प्रभाग क्र.१० चे विजय बाबुराव पवार, सौ. रुख्मिणी सुभाष पवार, सौ. कार्तिकी मनोज इंगळे, श्री. शेख नईम मोहम्मद, प्रभाग क्र.११ चे श्री. शेख अजीज शेख जमील मणियार, सौ. कान्होपात्रा गजानन लाड, सौ. हीना फिरदोस मोसिन खान, श्री. धरमसिंग रणजीतसिंग ठाकूर आदींची उपस्थिती होती.

दानवे पुढे म्हणाले की, भाजपाने केंद्र व राज्य पातळीवर विकासाचे मजबूत मॉडेल उभे केले आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, डिजिटल सुविधा आणि पारदर्शक प्रशासन या सर्व बाबींमध्ये भाजपाची ओळख आहे. जालना शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेत व दर्जेदार मिळाव्यात, यासाठी भाजपाची महापालिका आवश्यक आहे. आज जालना शहरासमोर पाणीटंचाई, वाहतूक कोंडी, अस्वच्छता, नियोजनाचा अभाव अशा अनेक समस्या आहेत. भाजपाच्या नेतृत्वाखाली या सर्व प्रश्नांवर ठोस उपाययोजना राबवण्यात येतील. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा थेट लाभ जालना शहरातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवला जाईल.

यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनीही भाजपाच्या विकासात्मक धोरणावर विश्वास व्यक्त करत नागरिकांनी सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. भाजपा म्हणजे केवळ निवडणूक नाही, तर विकासाचा संकल्प आहे, असे ते म्हणाले.

सभेच्या शेवटी रावसाहेब पाटील दानवे यांनी जालनकरांना एकजुटीने भाजपाच्या उमेदवारांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन करत, जालना महापालिका भाजपाच्या ताब्यात द्या, आम्ही जालना शहराला मराठवाड्याचा आदर्श विकास मॉडेल बनवू, असा विश्वास व्यक्त केला.

# डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी




**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथे डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रमाता मां.जिजाऊ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.स्वराज्य व्हावे ही श्री ची इच्छा होती आणि त्याप्रमाणे मा जिजाऊंनी शिवबांना शिक्षण दिले.जिजाऊंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे झाला.त्यांचे वडील लखुजी जाधव आणि आई म्हाळसाबाई यांनी त्यांच्या वर बालपणापासून शौर्याचे व न्यायाचे संस्कार केले.केवळ तलवारी च्या जोरावर नाही बुद्धीच्या चातुर्यानेही त्यांनी आपली ओळख निर्माण केली. त्या काळी रयतेवर होत असलेला अन्याय पाहुन जिजाऊ चे मन विषण्ण व्हायचे.पण त्यांनी साश्रू नयनांनी अन्याय पाहिला नाही तो अन्याय मुळापासून उपटून टाकण्या साठी आपल्या शिवबांना तयार केले.असे श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी विचार मांडताना सांगितले. त्यावेळी शाळेतील मुलींनी मा जिजाऊ च्या वेशभूषांमध्ये जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन केले व आपले विचार मांडले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीमती सय्यद नसरीन.पाटील भाग्यश्री .काळे साधना .सरकटे मॅडम . कू. सनईकर त्रिवेणी. शेळके गजानन.इत्यादींनी मेहनत घेतली.

# थंडी आणि अंधारापूर्वीच मतदानाचा हक्क बजावावा

## ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांग मतदारांना निवडणूक अधिकारी अशीमा मित्तल यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीमध्ये समाजातील प्रत्येक घटकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. विशेषतः वयोवृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी श्रीमती अशीमा मित्तल यांनी ज्येष्ठ मतदारांना सकाळीच मतदान केंद्रावर जाऊन आपला हक्क बजावण्याचे विशेष आवाहन केले आहे. निवडणुकीसाठी मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. सध्या हिवाळ्याचे दिवस असल्याने सायंकाळच्या वेळी थंडीचे प्रमाण वाढते आणि सूर्यास्तामुळे लवकर अंधार पडतो. ही बाब विचारात घेता, ज्येष्ठ नागरिक आणि वयोवृद्ध मतदारांनी सायंकाळपर्यंत न थांबता, सकाळच्या सत्रातच मतदान केंद्रावर उपस्थित राहून मतदान करावे, जेणेकरून त्यांना कोणत्याही त्रासाला सामोरे जावे लागणार नाही.

श्रीमती अशीमा मित्तल यांनी या संदर्भात बोलताना सांगितले की, ज्येष्ठ नागरिक हे लोकशाहीचे स्तंभ आहेत. त्यांचा सहभाग या निवडणुकीत अत्यंत मोलाचा आहे. थंडीच्या दिवसांत सायंकाळी होणारी गर्दी आणि कमी होणारा प्रकाश यामुळे वयोवृद्ध मतदारांना चालणे किंवा रांगेत उभे राहणे कठीण जाऊ शकते. त्यामुळे सर्व ज्येष्ठ बांधवांनी सकाळी लवकर मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.

# जालना जिल्हा परिषदेत एसीबीचा मोठा धमाका! पगार काढण्यासाठी लाच घेणारा 'वरिष्ठ सहाय्यक' गजाआड

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील भ्रष्टाचाराचा एक संतापजनक प्रकार समोर आला असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (CB) सापळा रचून एका वरिष्ठ सहाय्यकाला रंगेहात अटक केली आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांचा कापलेला सात दिवसांचा पगार पुन्हा काढण्यासाठी ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या सुनील काशिनाथ खंदाडे (५४) याला ४ हजार रुपये घेताना पकडण्यात आले.

तक्रारदार हे स्वतः एक वैद्यकीय अधिकारी आहेत. ऑक्टोबर २०२५ मध्ये त्यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सात दिवसांचे वेतन कापण्यात आले होते. हे हक्काचे वेतन पुन्हा मिळवण्यासाठी आरोग्य विभागातील वरिष्ठ सहाय्यक सुनील खंदाडे याने आडमुठी भूमिका घेतली. पगार काढून देण्याच्या बदल्यात त्याने प्रत्येक वैद्यकीय अधिकाऱ्याकडून ५,००० रुपयांची उघड मागणी केली. हक्काच्या पैशांसाठी लाच द्यावी लागत असल्याने संतापलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी थेट एसीबीकडे धाव घेतली.

आज, १२ जानेवारी २०२६ रोजी दुपारी जिल्हा आरोग्य विभागाच्या कार्यालयातच एसीबीने सापळा रचला होता. तडजोडीअंती ४,००० रुपये स्वीकारण्याचे ठरले. खंदाडे याने स्वतःच्या कक्षात तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्वीकारताच, दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्याला झडप घालून ताब्यात घेतले. खंदाडेच्या ताब्यातून लाचेची रक्कम, मोबाईल आणि इतर रोकड जप्त करण्यात आली आहे. या कारवाईनंतर कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे. आरोपी सुनील खंदाडे याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्या चिखली (जि. बुलढाणा) येथील घराचीही झडती घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या कारवाईने जिल्हा परिषद वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे. कारवाई करणारे पथक ही धडाकेबाज कारवाई ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस अधीक्षक माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे, पोलीस उपअधीक्षक बाळासाहेब जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे, कोमल शिंदे आणि त्यांच्या पथकाने यशस्वी केली.

नागरिकांना आवाहन कोणत्याही शासकीय कामासाठी लाचेची मागणी होत असल्यास घाबरू नका! भ्रष्टाचार मुळापासून उपटण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधा टोल फ्री क्रमांक: १०६४ व्हॉट्सप: ९७६४०२१०६४ एसीबी जालना: ९८८१४६३३६५ भ्रष्टाचाराला थारा देऊ नका, लाच मागणाऱ्यांना धडा शिकवा!

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.